**अतारांकित प्रश्नोत्तरांची ३ री यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### साखरे (ता.डहाणू, जि.पालघर) गावातील पाणीपुरवठा नियमित होण्याबाबत

**(१) २१७ (२४-०४-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरे (ता.डहाणू, जि.पालघर) गावातील ग्रामस्थांना मागील अनेक वर्षापासून गावात पुरेसे पिण्याचे पाणी मिळत नसल्याने नागरिकांना पाणीटंचाईस सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाणगाव येथील साखरे गावात १९६७ साली तारापूर अनुशक्ती केंद्राला पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने शासनाने धरण बांधले त्यानंतर सन २०१४ मध्ये २६ गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी बाडा पोखरण प्रादेशिक पाणीपुरवठा योजना अंमलात आणून या योजनेत डहाणूच्या पश्चिम भागातील साखरे, गोवणे, दाभले, वनई, डेहणे पळे इत्यादी गावांचा यामध्ये समावेश करण्यात येऊन त्यासाठी साखरे व इतर ठिकाणी बांधण्यात आलेल्या जलकुंभाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे जलकुंभाला गळती लागल्याने साखरे गावास पाणीपुरवठा होऊ शकत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर जलकुभांची दुरुस्ती करुन साखरे गावातील पाणीपुरवठा नियमित होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२७-०६-२०२५) :** (१) सदरची बाब अंशतः खरी आहे.

साखरे गावामध्ये अस्तित्वातील स्थानिक उद्भवापासुन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत आहे. साखरे हे गाव बाडा पोखरण व २९ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट असून सदर योजना सद्यस्थितीत जिल्हा परिषदेमार्फत कार्यान्वित ठेवण्यात येवून समाविष्ट गावांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे, तथापि साखरे गावाच्या संबंधित उपांगाचे दैनंदिन परिचालन करून पाणी पुरवठा नियमित कार्यान्वित ठेवण्याच्या अभावामुळे साखरे गावास नियमित पाणी पुरवठा होत नाही. ग्रामपंचायत साखरे यांचे पाणी टंचाईबाबत ग्रा.पा.पु. उपविभाग डहाणूकडे पत्रव्यवहार प्राप्त झालेला नाही.

(२) साखरे येथील जलकुंभाचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले नसून निकृष्टतेच्या कारणामुळे साखरे गावास पाणी पुरवठा होऊ शकत नाही, हे खरे नाही. जिल्हा परिषदेमार्फत साखरे गावांच्या योजनेच्या उपांगाचे दैनंदिन परिचालन करून नियमित कार्यान्वित ठेवण्याच्या अभावामुळे तसेच योजना कार्यान्वित ठेवताना पुरेशा देखभाल दुरुस्ती अभावी योजनेतील उंपागामध्ये विषेशतः उंच साठवण टाक्यामधील निर्माण झालेल्या पाईप जोडणी मधील त्रुटीमुळे पाणी पुरवठा नियमित होत नाही,

(३) साखरे गावांचा जलकुंभ सद्यस्थितीत पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टिकोणातुन सुस्थितीत आहे. साखरे गावास पाणी पुरवठा नियमित करण्यासाठी जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत बाडापोखरण व २९ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या रेट्रोफिटींगचे काम हाती घेण्यात आलेले आहे. तसेच जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत वितरण व्यवस्था व नळ जोडणीची कामे हाती घेण्यात आलेले आहेत. उपरोक्त दोन्ही कामे पूर्ण झाल्यानंतर साखरे गावास पाणी पुरवठा नियमित होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री क्षेत्र अरण (ता.माढा, जि.सोलापूर) संत सावता महाराज समाधी स्थळाचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंजूर करणेबाबत**

**(२) ३५० (०८-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री क्षेत्र अरण (ता.माढा, जि.सोलापूर) संत सावता महाराज समाधी स्थळाचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनूषंगाने रुपये १४० कोटी रक्कमेचा आराखडा बनवून जिल्हाधिकारी सोलापूर यांनी माहे डिसेंबर २०२४ मध्ये वा शासनास पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, तद्नुसार संत सावता महाराज समाधी स्थळाचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंजूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१६-०६-२०२५) :** (१), (२) आणि (३) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०५.०९.२०२४ रोजी संपन्न झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत श्री. क्षेत्र संत शिरोमणी सावता माळी महाराज संजीवनी समाधी, अरण ता. माढा जि. सोलापूर या तीर्थक्षेत्रास " अ" वर्ग दर्जा देण्यात येऊन प्रथम टप्प्यात रू. २५.०० कोटींच्या विकास कामास प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सदर तिर्थक्षेत्रास शासन निर्णय क्र. तीर्थवि-२०२५/ई-१०१०२६६/यो-११ दिनांक १३/०५/२०२५ अन्वये "अ" वर्ग दर्जा देण्यात आला आहे. तसेच, याविभागाच्या दिनांक २०/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर तीर्थक्षेत्राचा रू. १०० कोटीचा विकास आराखड्याचा प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठी भाषा भवनाच्या इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(३) ३९४ (२४-०४-२०२५). श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.हारुन खान (वर्सोवा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषा भवनाच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन दिनांक २ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या बांधकामाला अद्यापी सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बांधकामास सुरुवात न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर इमारतीच्या बांधकामास सुरुवात करुन ते पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२६-०५-२०२५) :** (१), (२), (३), (४) व (५) मराठी भाषा विभाग व शालेय शिक्षण यांच्याकडील भूखंडांचे एकत्रिकरण आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग व मराठी भाषा विभाग यांच्याकडील भूखंडांच्या आराखडयांमध्ये बदल करण्यात आला आहे. सदर बांधकामास दिनांक १.०३.२०२४ अन्वये रु.१५०.१४ कोटी इतक्या

रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून रु.१०८.७३ कोटी इतक्या रकमेची निविदा प्रक्रिया राबवून दिनांक ९.१०.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित केले आहेत.

सदर जागेवरील जुनी इमारत पाडण्याचे काम पूर्ण झाले असून शोअर पाईलिंगचे ६५ टक्के काम झाले आहे. उर्वरित पाईलचे काम व खोदकाम सुरु आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये मराठी भाषा भवनाच्या मुख्य केंद्राच्या बांधकामासाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

---

**रातवड (जि.रायगड) येथे पादत्राणे आणि चर्मोद्योग समुह विकास प्रकल्पाची उभारणी करणेबाबत**

**(४) ५०८ (२४-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रातवड (जि.रायगड) येथे पादत्राणे आणि चर्मोद्योग समुह विकास प्रकल्पाची उभारणी करण्यास केंद्र शासनाच्या वाणिज्य विभागाने दिनांक ९ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, दिघी बंदर येथे औद्योगिक केंद्र विकसित करुन सदर प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.

भारत सरकारच्या Ministry of commerce and Industry Department of Industrial Policy and promotion (Leather and Foot ware section) यांच्याकडील दिनांक २६.०२.२०२४ च्या पत्रान्वये मौजे रातवड, जि. रायगड येथे मेघा लेदर फूटवेअर आणि असेसरीज क्लस्टर विकसित करण्यास मान्यता दिली आहे.

(२) हे खरे आहे.

रायगड जिल्हातील माणगांव तालूक्यात एमआयडीसी मार्फत संपादित क्षेत्रावर १५३ एकर क्षेत्रावर दिघी पोर्ट इंडस्ट्रियल एरिया (DPIA) मध्ये सदर प्रकल्पाची उभारणी सुरु करण्यास मान्यता प्राप्त आहे.

(३) सदर प्रकल्पाची एकूण किंमत २५६.४२ कोटी असून GOI कडून मान्यता प्राप्त ग्रॅट ही १२५ कोटी असून भूसंपादन प्रक्रिया पुर्ण होवून सदर लेदर क्लस्टर विकसित करण्यासाठी महामंडळाच्या अभियांत्रिकी विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हयात औद्योगिक वसाहतीत नवीन उद्योग सुरु करणेबाबत**

**(५) ६२८ (२४-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथे औद्योगिक वसाहतीत नवी उद्योग सुरु करण्यासाठी जमीन शिल्लक नसल्याने गंगाखेड रोडवरील उजळअंबा व बाभळगाव शिवारातील ७०० हेक्टर तसेच सेलू तालुक्यातील जवळपास २०० हेक्टर जमीन भूसंपादित करण्याचा प्रस्ताव गेल्या १० वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास अद्यापही मंजूरी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार परभणी जिल्ह्यातील तरुणांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी नवीन उद्योग सुरु करण्याकरीता आवश्यक असलेला भूखंड उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अतिरिक्त परभणी औद्योगिक क्षेत्र स्थापन करणे करीता गौजे-बाभुळगांव व मौजे-उजलंबा येथील एकूण ७०२.०५ हेक्टर आर क्षेत्रास म.औ.वि.अधिनियम, १९६१ अन्वये प्रकरण ६ च्या तरतूदी दिनांक ०७/०२/२०११ रोजी लागू करण्यात आलेल्या आहेत. प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रातील मौजे-बाभुळगाव येथील २६४.०२ हे. आर क्षेत्राची संयुक्त मोजणी दिनांक ०५/०९/२०१७ रोजी पूर्ण करण्यात आलेली आहे. तथापि मौजे-उजळंबा येथील खातेदारांनी संयुक्त मोजणीस विरोध केल्याने तेथील मोजणी अद्याप होऊ शकलेली नाही.

सेलू औद्योगिक क्षेत्राकरीता मौजे हदगांवखुर्द, मौजे रवळगांव व मौजे पिंपळुरा येथील एकूण २४५.८१ हे.आर, क्षेत्रास म.औ.वि. अधिनियम, १९६१ अन्वये प्रकरण ६ च्या तरतूदी दिनांक ०३/१२/२०१६ रोजी लागू करण्यात आलेल्या असून कलम ३२ (२) अधिसुचना दिनांक २/८/२०१८ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करणेत आली आहे.

सदरहू औद्योगिक क्षेत्राचे भूसंपादन व तद्अनुषंगिक खर्च तसेच विकास कामावरील खर्च विचारात घेता विकसित भुखंडाचा दर हा अवाजवी येत असल्यामुळे एखादया मोठ्या कंपनीकडून मागणी आल्यास सदरचे भूसंपादन Pass Through पध्दतीने करण्याचे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून निश्तिच करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साक्री (जि.धुळे) पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या विस्तारीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(६) ७५६ (१८-०४-२०२५). श्रीमती मंजुळा गावित (साक्री) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील साक्री पंचायत समितीच्या सध्या सुरु असलेल्या इमारतीत अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने बरेच विभाग हे मूळ इमारतीच्या आजूबाजूस असलेल्या जुन्या इमारतींमध्ये कार्यरत असल्याने येथे कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना व कर्मचाऱ्यांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साक्री पंचायत समितीच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या मजल्यावर बांधकामासाठी पुरेशी जागा उपलब्ध असल्याने पंचायत समितीच्या उप अभियंत्यांनी सदर इमारतीच्या विस्तारीकरणासाठी नकाशा व अंदाजपत्रक तयार केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साक्री पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेला ६ कोटी ३० लक्ष्य रुपयाचा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री याचेकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने साक्री पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या विस्तारीकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०५-०६-२०२५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) पंचायत समिती, साक्री (जि.धुळे) येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामाचा परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यावर यांसदर्भात निधी, निकष, प्राथम्य क्रम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

---

## ट्रायसेम हातपंप देखभाल दुरुस्ती कर्मचारी यांना शासनसेवेत सामावून घेणेसह वेतन व भत्ते लागू करणेबाबत

**(७) १००९ (२४-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ट्रायसेम हातपंप देखभाल दुरूस्ती कर्मचारी सन १९८६ पासून अद्यापपर्यंत सेवा देत असून त्यांना अत्यल्प वेतनामध्ये उपजिविका चालवावी लागत असल्याने कर्मचाऱ्यांना शासनसेवेत सामावून वेतन व भत्ते लागू करण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याबाबत दिनांक ०२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा. ग्रामविकास मंत्री यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार उक्त कर्मचाऱ्यांना शासनसेवेत सामावून घेणे, वेतन व भत्ते लागू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०२-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

या आशयाची विविध लोकप्रतिनिधींची व कर्मचाऱ्यांची निवेदन प्राप्त आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत परिचालीत पाणी पुरवठा योजनांवरील रोजंदारी तत्वावरील कार्यरत ३४७ व सेवानिवृत्ती ५४७ अशा एकूण ७९४ कर्मचाऱ्यांना रुपांतरीत नियमित अस्थायी कर्मचारी म्हणून जिल्हा परिषदेचे आस्थापनेवर घेऊन त्यांच्या वेतन व भत्ते व सेवानिवृत्त वेतनाचे दायित्व शासनाने दि.३०/०१/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वे स्वीकारले आहे.

हातपंप/वीजपंप देखभाल दुरुस्तीकरीता त्रिस्तरीय योतनेंतर्गत जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर नियमित पदावर नियमित कर्मचाऱ्याच्या/ वेतन व सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्व राज्यशासनाने दि.०९/०८/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वीकारले आहे. सदरील प्रयोजनासाठीच्या १७५२ कर्मचाऱ्यांच्या/मनुष्यबळाच्या मानधन/वेतन/ सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्व जिल्हा परिषदेकडे होते. त्यापैकी १०७४ कर्मचाऱ्यांच्या वेतन व सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्व राज्य शासनाने घेतलेले आहे. परिणामी, जिल्हा देखभाल दुरुस्ती निधी/ जिल्हा परिषद दायित्व/ हातपंपं वर्गणी यावरील वेतन व भत्त्यांचा बोजा आता कमी झाला असून राज्यातील १० जिल्हा परिषदेत कार्यरत उर्वरीत ४०२ ट्रायसेम अंतर्गत मेहनताना तत्वावर नियुक्ती कर्मचारी व कंत्राटी मनुष्यबळाच्या मानधन/मेहनताना देणे जिल्हा परिषदांना शक्य आहे. सदरील कर्मचाऱ्यांचे दायित्व जिल्हा परिषदेचे असून राज्य शासनामार्फत दायित्व स्वीकारणे संयुक्तीक होणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हयातील गेटेड बंधारा योजनांच्या अंदाजपत्रकास जलसंधारण महामंडळाअंतर्गत प्रशासकीय मान्यता देणेबाबत

**(८) १०९७ (१८-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी व तासगाव तालुक्यातील ५८ गेटेड बंधारा योजनांच्या अंदाजपत्रकास जलसंधारण महामंडळाअंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्रस्तावांना तात्काळ प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०३-०६-२०२५) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सन २०२३-२४ मध्ये अप्पर आयुक्त, जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे यांचेमार्फत सांगली जिल्हयातील खानापूर, आटपाडी व तासगांव तालुक्यातील एकूण ८९.५० कोटी किंमतीच्या ५८ गेटेड बंधारा/ को.प.ब./ रु.सा.त./सा.त./पा.त.पुर्नस्थापना योजनांचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी महामंडळास सादर करण्यात आले आहेत.

(२) अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे यांचे मार्फत प्रशासकीय मान्यता प्रस्तावापैकी महामंडळाकडील दायित्व, अर्थसंकल्पिय तरतूद व उपलब्ध निधी विचारात घेता सांगली जिल्हयातील खानापूर, आटपाडी व तासगाव तालुक्यतील एकूण रु. ३५.३१ कोटी किंमतीच्या ११ गेटेड बंधारा/ को.प.ब./ रु.सा.त. /सा.त. योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयात औद्योगिक वसाहत सुरु करणेबाबत

**(९) ११२९ (०९-०४-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील तरुण व नवीन उद्योजकांना चालना मिळावी व स्थानिकांना रोजगार मिळावा याकरिता हदगाव व हिमायतनगर येथे नव्याने एमआयडीसी (MIDC) सुरू करण्याची घोषणा तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली असून तेथे एमआयडीसी सुरु करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये मा.उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मौजे खानापूर (ता.देगलूर, जि.नांदेड) येथील औद्योगिक वसाहतीत जागेअभावी नवीन उद्योग येत नसल्याचे निदर्शनास आले असून येथे नवीन उद्योगासाठी ७५ हेक्टर जमिनीची वारंवार मागणीही करूनही शासन कोणतेही दाखल घेत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०६-२०२५) :** (१) सदर प्रकरणाची वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे.

सन २०२३ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्तावित हदगाव औद्योगिक क्षेत्राकरीता दि.०४/०७/२०२३ रोजी मौजे रुई व अंबाळा (ता. हदगाव जि. नांदेड) येथील ३५.९५ खाजगी व ३१.३१ सरकारी असे एकूण ६४.२६ हे.आर. जमिनीची स्थळ पाहणी उप.मु.का.अ. (३), मऔविम, मुंबई यांचे अध्यक्षतेखालील भू-निवड समिती मार्फत करण्यात आलेली आहे.

प्रस्तावित क्षेत्राकरिता पाहणी करण्यात आलेली जमिन ही डोंगराळ स्वरुपाची असून असमान/असमतल आहे. त्यामुळे संपादित जमिनीवर विकास आराखडा तयार करणे नियोजन व तांत्रिकदृष्ट्या अडचणीचे होईल त्यामुळे सदर ठिकाणी औद्योगिक क्षेत्र स्थापन करणे संयुक्तिक होणार नाही असा असा निष्कर्ष भू-निवड समितीने नोंदविलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी भू-निवड समितीचे निर्देश व मऔवि महामंडळाच्या मुख्यालयातील भुसंपादन विभागाच्या सुचनेनुसार हदगाव व हिमायतनगर तालुक्यात सरकारी जमिनीच्या उपलब्धतेविषयी तहसिलदार, हदगाव यांना दिनांक १२/१२/२०२३, दि.३१/०१/२०२४, दि. ०७/१०/२०२४ व दि. ०६/०१/२०२५ अन्वये मऔवि महामंडळाकडून विचारणा करण्यात आलेली आहे.

तथापि याबाबत तहसिलदार, हदगाव यांचेकडील अहवाल अदयाप अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त झालेनंतर तहसिलदार, हदगाव यांनी सुचित केलेल्या जमिनीची स्थळ पाहणी भू-निवड समितीमार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दि. १५/०३/२०२३ व दि. १७/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये देगलूर औद्योगिक क्षेत्राच्या विस्ताराकरीता ७८ हेक्टर जमिन संपादित करण्याबाबत मागणी करण्यात आली होती. त्याअनुषंगाने मऔवि महामंडळाच्या कार्यरत देगलूर औद्योगिक क्षेत्रालगत किंवा परिसरात सरकारी जमिनीच्या उपलब्धतेविषयी तहसिलदार, देगलूर यांना दि.१९/०५/२०२३, दि.१९/१२/२०२३ व दि.०२/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मऔवि महामंडळामार्फत विचारणा करण्यात आलेली आहे. तथापि, तहसिलदार, देगलूर यांच्याकडून अहवाल अदयाप प्राप्त झालेली नाही.

प्रस्तावित अति. देगलूर औद्योगिक क्षेत्राच्या स्थापनेकरीता तहसिलदार, देगलूर यांचेकडील अहवाल प्राप्त झाल्यानंतर मऔवि महामंडळामार्फत आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खानापूर व आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील मातोश्री ग्रामपंचायत योजनेंतर्गत इमारतीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१०) ११७४ (१८-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने बाळासाहेब ठाकरे मातोश्री ग्रामपंचायत योजनेंतर्गत राज्यभरात ग्रामपंचायत कार्यालय उभारणीकरिता मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत सांगली जिल्ह्यातील खानापूर व आटपाडी तालुक्यातील ग्रामपंचायत इमारतीचे प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक ०७ जानेवारी, २०२५ रोजीच्या निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०५-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) खानापूर व आटपाडी जिल्हा सांगली येथील मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजने अंतर्गत इमारत बांधकामांचा प्रस्ताव प्राप्त झाला असून यांसदर्भात निधी, निकष, प्राथम्य क्रम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य कुपोषणमुक्त करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(११) १३६२ (२४-०४-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या ग्रामीण भागासोबतच शहरी भागातही कुपोषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याची अतिशय गंभीर बाब निदर्शनास आली असून राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार देशात ० ते ५ वयोगटातील एक तृतीयांश मुले कमी वजनाची आणि दोन तृतीयांश मुले अशक्त असल्याचे आकडेवारीतून निदर्शनास आले असून पोषण-२ योजनेंतर्गत राज्याला सन २०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४ या तीन आर्थिक वर्षांत एकूण ५,०५९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असूनही कुपोषित मुलांच्या बाबतीत राज्य देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी (जि.ठाणे) येथे ८० कुपोषित बालके आढळली असून ही बालके शहरी भागातील कामगार वस्ती, झोपडपट्टी येथील असल्याने शासनाची त्रिसूत्री योजना अयशस्वी झाली असल्याचे निदर्शनास आले असून याशिवाय ठाणे, पालघर आणि भिवंडी येथील ग्रामीण भागात आणि आदिवासी पाडयांत कुपोषित बालकांची संख्या जास्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यातील आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात कुपोषित बालके आढळून आले असून अकोले तालुक्यात ५७४ बालके कुपोषित असून त्यातील ८२ बालके ही SAM (severe acute malnutrition) व ४९२ बालके ही MAM(moderate acute malnutrition) आहेत तर २९ बालके ही दुर्धर आजाराने त्रस्त असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील इतर जिल्ह्यातील कुपोषित बालकांची आकडेवारी शासनाकडे उपलब्ध आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून राज्यातील कुपोषण कमी करण्यासाठी ग्रामीण व नागरी भाग, झोपडपट्ट्या तसेच आदिवासी पाडे कुपोषणमुक्त करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१६-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ४४९ इतके ग्रामीण व आदिवासी प्रकल्प कार्यरत आहेत. तसेच, १०४ शहरी बाल विकास प्रकल्प कार्यरत आहेत.

पोषण ट्रॅकरवरील माहे एप्रिल, २०२५ च्या माहितीनुसार पोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| एकूण वजन व उंची घेतलेली बालके | मध्यम कुपोषित श्रेणीमधील बालके | % | तीव्र कुपोषित श्रेणीमधील बालके | % |
|---|---|---|---|---|
| ४८२२२१५ | १६१५९१ | ३.३५ | २९११४ | ०.६ |

NATIONAL FAMILY HEALTH SURVEY २०१९-२० NFHS-५ नुसार Weight for Age अधारित कुपोषण स्थितीमध्ये बिहार क्र. १ वर येत असून कुपोषणाचे प्रमाण ४१.०% इतके आहे, गुजरात क्र. २ वर येत असून कुपोषणाचे प्रमाण ३९.७% इतके आहे, झारखंड क्र. ३ वर येत असून कुपोषणाचे प्रमाण ३९.४% इतके आहे, दादरा नगर हवेली क्र. ४ वर येत असून कुपोषणाचे प्रमाण ३८.७% इतके आहे आणि महाराष्ट्र राज्य देशामध्ये ५ नंबरवर येत असून राज्यात कुपोषणाचे प्रमाण ३६.१% इतके आहे.
(२) पोषण ट्रॅकरवरील माहे एप्रिल च्या माहितीनुसार पोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| क्षेत्र | एकूण वजन घेतलेली बालके | तीव्र कुपोषित श्रेणीमधील बालके | % |
|---|---|---|---|
| ठाणे (आदिवासी क्षेत्र) | २७१९४ | १८१ | ०.६६ |
| पालघर (आदिवासी क्षेत्र) | ९५४६५ | २५५ | ०.२६ |

(३) हे खरे नाही.

पोषण ट्रॅकरवरील माहे एप्रिल च्या माहितीनुसार अहिल्यानगरची पोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| क्षेत्र | एकूण वजन व उंची घेतलेली बालके | मध्यम कुपोषित श्रेणीमधील बालके | % | तीव्र कुपोषित श्रेणीमधील बालके | % |
|---|---|---|---|---|---|
| अकोले प्रकल्प | ८५७० | २१४ | २.५ | ३५ | ०.४१ |
| राजूर प्रकल्प | ५३८८ | २७८ | ५.१ | ४७ | ०.८७ |

(४),(५) व (६) राज्यातील इतर जिल्हयातील कुपोषित बालकांची आकडेवारी शासनाकडे उपलब्ध आहे. कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, महिला, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये अमृत आहार योजना सुरु असून हया योजने अंतर्गत गरोदर महिला व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार तर ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडी देण्यात येतात.

३) तसेच राज्यातील ग्रामीण भागातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये सॅम बालकांना तीन वेळा Energy Dense Nutritious Food चा पुरवठा करण्यात येतो. तसेच आरोग्य खात्यामार्फत आवश्यकतेनुसार औषधोपचार करण्यात येतो.

४) नागरी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्रांच्या धर्तीवर नागरी बाल विकास केंद्र सुरू करण्यात येत आहेत.

५) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी  विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

---

**राज्यात "मिशन शक्ती सामर्थ्य" या कार्यक्रमांतर्गत सर्व अंगणवाडयांमध्ये "पाळणाघर योजना" सुरू करणेबाबत**

**(१२) १५०३ (२४-०४-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात "मिशन शक्ती सामर्थ्य" या कार्यक्रमाअंतर्गत सर्व अंगणवाडयांमध्ये "पाळणाघर योजना" सुरू करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सुरु केली असल्यामुळे या योजनेत केंद्र व राज्य शासनातर्फे करण्यात येण्याऱ्या खर्चाचे स्वरुप कसे असेल व त्याबाबतचे नियोजन तयार करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, राज्यात या योजनेअंतर्गत किती पाळणाघर सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे तसेच यासाठी नवीन पद निर्मिती करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना कधीपासून अंमलात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१३-०५-२०२५) :** (१) मिशन शक्ती सामर्थ्यं अंतर्गत राज्यात पाळणा (Aganwadi Cum Creche) ही केंद्र पुरस्कृत योजना सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आवश्यक त्या ठिकाणी अंगणवाडी मध्ये पाळणा सुरु करण्यास मान्यता दिल्यानंतर पाळणा कार्यन्वित करण्यात येतील.

(२) सदर योजनेकरिता येणाऱ्या खर्चाचे प्रमाण केंद्र हिस्सा ६० % व राज्य हिस्सा ४० % याप्रमाणे आहे.

(३) (४) व (५) सद्यस्थितीत राज्यात ३४५ पाळणाघर (Aganwadi Cum Creche) सुरु करण्यास व तेथे पाळणा सेविका व पाळणा मदतनीस यांची पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**मौजे वयाळ (ता. खालापूर, जि.रायगड) येथील शेतकऱ्यांच्या जमीनींचा मोबदला मिळण्याबाबत**

**(१३) १६४७ (२४-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वयाळ (ता. खालापूर, जि.रायगड) येथील न्हावा शेवा पाणीपुरवठा योजना टप्पा ३ साठी संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या खाजगी जमीनींचा वाढीव मोबदला गेल्या सहा वर्षांपासून मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांना मोबदला मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने सदर प्रकरणी शेतकऱ्यांच्या वाढीव खाजगी जमीनींचा मोबदला तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१६-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) न्हावा-शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३ च्या अनुषंगाने मौजे वयाळ, ता. खालापूर येथील गट क्र. ७/ड/१०/अ व गट क्र. ३५ येथील भूसंपादन करणेसाठीचे प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पनवेल कार्यालयामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास अनुक्रमे दि. ०५.०५.२०२१ व दि. २०.०५.२०२१ रोजी सादर करण्यात आले. भूसंपादन मोजणी उप अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, खालापूर यांचेमार्फत दि.२५.०८.२०२३ रोजी करण्यात आली.

उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), रायगड यांनी पत्र क्र.उजि (भू) रा.अ. /कार्या-१/वयाळ/दर निश्चिती बाबत/२०२४, दि. २९/०८/२०२४ अन्वये भूसंपादन कामी लागणारा आवश्यक निधी रु. ६,७६,८१,८१५/- जमा करण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पनवेल कार्यालयास कळविले आहे. मंजुर योजनेमध्ये भू-संपादनासाठी रु. ६.०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. आतापर्यंत कोर्टाच्या निवाड्याप्रमाणे वाढीव दरानुसार एकुण रु.३.९६ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे. त्यामुळे सदर योजनेच्या भू-संपादनासाठी सद्यःस्थितीत एकूण रक्कम रु.२.०३ कोटी शिल्लक आहे. यापैकी रु. १,८५,२१,४८४/- इतका निधी दि.०६/०२/२०२५ रोजी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रायगड कार्यालयास वर्ग करण्यात आला आहे. सुधारीत न्हावा-शेवा पाणी पुरवठा योजनेमध्ये भू-संपादनासाठी तरतुद वाढवून २०.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे. सुधारीत योजना मंजुरीनंतर निधी प्राप्त होताच उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), रायगड यांचेकडे वर्ग करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घोटी (जि.नाशिक) शहराकरिता भावली धरणातून थेट पाणीपुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत**

**(१४) १६५२ (३०-०४-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील घोटी शहराकरिता भावली धरणातून थेट पाणीपुरवठा योजनेचे काम गेल्या काही वर्षापासून अत्यंत दिरंगाईने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास संबधित अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आढावा बैठकीत लोकप्रतिनिधीनकडून करण्यात आलेल्या सुचनानुसार शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२४-०६-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

दिनांक १०.०१.२०२५ रोजी आढावा बैठक घेण्यात आली.

(२) जलजीवन मिशन योजनेअंतर्गत घोटी बु. पाणी पुरवठा योजनेचे संबंधित ठेकेदारास उपांगनिहाय योजना पुर्ण करण्याचे उदिष्ट देण्यात आले. योजनेची सरासरी भौतिक प्रगती ६५% इतकी झालेली आहे. योजनेसाठी वापरण्यात येत असलेले बांधकाम साहित्य जसे की खडी, वाळु, सिमेंट, स्टील यांची गुणवत्ता तपासणी करण्यात येते. तसेच कामाच्या गुणवत्ता तपासणीसाठी शासनामार्फत नियुक्त झालेल्या त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणा M/s. NABCONS यांचेमार्फत तपासणी करण्यात येते.

ठेकेदारामार्फत झालेल्या विलंबाबत ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे व दंड आकारण्यात आला आहे.

या व्यतिरिक्त योजनेच्या प्रगतीत सुधारणा न झाल्यास संबंधित ठेकेदारास काळया यादीत समावेश करणेबाबत कारवाईची नोटीस देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात औद्योगिक गुंतवणूक वाढविण्यासाठी करावयाची उपाययोजना

**(१५) १६८७ (१७-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औद्योगिक गुंतवणूक वाढविण्यासाठी शासनाने येत्या शंभर दिवसात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यात असलेल्या साडेतीन हजार एकर जमिनीचे वाटप करण्याचे आदेश प्रशासनाला दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योग उभा करण्यासाठी सर्वाधिक मागणी असणाऱ्या कोल्हापूर/सोलापूर येथील एमआयडीसीमध्ये जागा शिल्लक नसल्याने नवीन उद्योग उभारणी होऊ शकत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ज्या औद्योगिक वसाहतीमध्ये जमिनी उपलब्ध नाहीत अशा एमआयडीसीमध्ये उद्योगासाठी शासन नविन जमिनीचे भूसंपादन करणार आहे काय,

(४) तसेच, जे उद्योग बंद झाले आहेत अशा सर्व जमिनीवर केवळ उद्योग उभारण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्रादेशिक कार्यालय सोलापूर व कोल्हापूर येथे वाटपासाठी उपलब्ध असलेल्या भूखंडाची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालय | वाटपासाठी उपलब्ध भूखंडाची संख्या | वाटपासाठी उपलब्ध क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | ११३ | २८.७३ |
| २ | सोलापूर | २१३ | ९१.६० |
| एकूण | | ३२६ | १२०.३३ |

(३) व (४) होय, राज्यात एकूण १४ ठिकाणी १२,०८९.२० हेक्टर क्षेत्र संपादनाची कार्यवाही सुरु आहे. तसेच १९ ठिकाणी १६,२०२.६२ हेक्टर क्षेत्र प्राधान्य तत्वावर नव्याने भूसंपादन करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच मऔवि महामंडळाने बंद असलेले उद्योग चालू करण्यासाठी धोरण निश्चित केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंतरजिल्हा बदलीचा ऑनलाईन ७ वा टप्पा वेळापत्रकासह तात्काळ राबविणेबाबत**

**(१६) १७१९ (०५-०५-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑनलाईन आंतरजिल्हा बदलीचा ७ वा टप्पा माहे जानेवारी,२०२५ मध्ये वेळापत्रकासह तात्काळ राबविणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास, मंत्री यांचेकडे दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१३-०६-२०२५) :** (१) व (२) जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत शिक्षक संवर्गाच्या आंतरजिल्हा बदलीबाबत शासनाने दि.२३.५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या सुधारित धोरणातील तरतुदीनुसार ऑनलाईन आंतरजिल्हा बदली सन २०२४-२५ राबविण्याकरीता शासनाच्या दि.२८.२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये वेळापत्रक निश्चित केले आहे. सदर वेळापत्रकानुसार ऑनलाईन आंतरजिल्हा बदलीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा (जि. भंडारा) येथे आयुध निर्माण (ऑर्डनन्स फॅक्टरी) कंपनीमध्ये झालेल्या स्फोटाबाबत**

**(१७) २०३४ (१९-०४-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवाहरनगर (जि.भंडारा) येथील ऑर्डिनन्स कारखान्याच्या एका इमारतीत दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या स्फोटात आठ ते नऊ कामगारांचा मृत्यू तर पाच जण गंभीर जखमी झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटामुळे आसपासच्या परिसरातील लोखंडी पत्रे हवेत उडून कारखान्याच्या बाहेर शेतशिवारात जाऊन पडले होते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्फोट कशामुळे झाला याची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार मृत कामगारांच्या वारसांना कोणती आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (११-०६-२०२५) :** (१) ऑडिनन्स फॅक्टरी भंडारा, युनिट ऑफ म्युनिशन इंडीया लि., (ता. व जि. भंडारा) या कारखान्यात दिनांक २४/०१/२०२५ रोजी स्फोट होऊन आठ कामगार मृत व पाच कामगार जखमी झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

तथापि, स्फोटामुळे कारखान्याची PE-२३ RCC इमारत जागेवरच कोसळली.

(३) कारखाना व्यवस्थापनाकडून आठ मृत कामगारांच्या वारसांपैकी सात कायम कामगारांना प्रत्येकी रु. ५० लाख रुपये आणि एका ट्रेड ॲपरेन्टीस कामगाराच्या वारसास रु. २५ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

पाच जखमी कामगार खाजगी रुग्णालयात उपचार घेत असून त्यांच्या उपचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापन करीत आहे. तसेच सर्व जखमी कामगारांना कारखाना व्यवस्थापनाकडून प्रत्येकी १ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

सदर अपघात प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, भंडारा यांच्याकडून चौकशी करण्यात आली असुन कामाच्या ठिकाणी कामाची योग्य सुरक्षित पद्धत न अवलंबविल्याबाबत कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७-अ (२) (अ) च्या भंगाबाबत भोगवटादाराविरुध्द कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यात अंगणवाडया सुरु करणेबाबत**

**(१८) २१०० (२४-०४-२०२५). श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात नवीन अंगणवाड्या नसल्यामुळे लहान बालके बालसंगोपनापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन अंगणवाड्या नसल्यामुळे बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देगलूर व बिलोली येथे नवीन अंगणवाड्या सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१३-०५-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत नवीन अंगणवाडी केंद्र सुरु करण्याकरिता केंद्र शासनाची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार राज्यात नवीन अंगणवाडी सुरू करण्यासंदर्भात केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सुधारित प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

---

**भूजल सर्वेक्षण विभागामार्फत सन २०२४-२०२५ मध्ये झालेल्या सर्वेक्षणात नाशिक जिल्ह्यातील गावे डार्क वॉटर शेडमध्ये आल्याबाबत**

**(१९) २१८५ (२४-०४-२०२५). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूजल सर्वेक्षण विभागामार्फत सन २०२४-२०२५ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात नाशिक जिल्ह्यातील ७७६ गावे ही डार्क वॉटर शेड मध्ये आल्याने या गावांमध्ये विहिरी खोदण्यास बंदी घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध शासकीय योजनेमध्ये मंजूर झालेल्या विहिरींचे खोदकाम शेतकऱ्यांना करता येणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदरहू गावातील शेतकरी हे या योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये व शेतकाऱ्यांना शेतीच्या सिंचनासाठी पाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०२-०६-२०२५) :** (१) व (२) होय खरे आहे,

नाशिक जिल्हयातील एकूण १५ तालुक्यात १९४८ गावे आहेत. भूपृष्ठीय रचनेनुसार नाशिक जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र एकूण ८० पाणलोट क्षेत्रामध्ये विभागले आहे. या पाणलोट क्षेत्राचे भूजल मुल्यांकन केंद्रीय भूमिजल मंडळ, नागपूर व भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात येते. सन २०२३-२४ मध्ये

करण्यात आलेल्या भूजल मुल्यांकनानुसार जिल्हयातील ८० पाणलोट क्षेत्र अतिशोषित ११, (१००% पेक्षा अधिक उपसा), शोषित ०४, (९०% ते १००% उपसा), अंशत: शोषित १७ (७०% ते ९०% उपसा) व सुरक्षित ४८ (७०% पेक्षा कमी उपसा) अशा वर्गवारीत विभागले आहे.

नाशिक जिल्हयातील ७७६ गावाचा समावेश अतिशोषित, शोषित, व अंशत: शोषित क्षेत्रात होत असल्याचे सन २०२२-२३ च्या मुल्यांकनानुसार दिसून येते. सन २०२३-२४ च्य भूजल मुल्यांकनाच्या अदयावत अहवालानुसार एकूण ७६४ गावांचा समावेश अतिशोषित (२२३), शोषित (१३४) अंशत: शोषित (४८७) पाणलोटात आहे.

अतिशोषित पाणलोट क्षेत्रातील २२३ गावे, शोषित पाणलोट क्षेत्रातील १३४ गावे, अशी एकूण ३५७ गावामध्ये उपसा नियंत्रित राहणेसाठी नवीन विहीर खोदण्यास नवीन विहिर शिफारस करण्यात येत नाही.

अंशत: शोषित पाणलोट क्षेत्रातील ४०७ गावांमध्ये सामुहिक विहिर घेण्याची शिफारस करण्यात येते. याशिवाय सुरक्षित पाणलोट क्षेत्रातील ६०% ते ७०% पर्यंत उपसा असलेल्या गावात (२३८ गावे) भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजना घेण्याच्या अटीवर विहिरीची शिफारस करण्यात येते.

६०% पेक्षा कमी उपसा असलेल्या गावांमध्ये (९४६ गावे) सर्वेक्षणाअंती व तांत्रिक निकषाप्रमाणे विहिरीची शिफारस करण्यात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कृषी स्वावलंबन योजना, बिरसामुंडा कृषी क्रांती योजना, पंतप्रधान कृषी सिंचन योजना, "हर खेत को पाणी " या केंद्र शासनाच्या योजनेच्या निकषानुसार अतिशोषित, शोषित, व अंशत: शोषित या क्षेत्रात व ज्या क्षेत्रात भूजल उपश्याची टक्केवारी ७०% पेक्षा जास्त आहे. अशा सर्व क्षेत्रात नविन सिंचन विहिर घेता येत नाही.

सुरक्षित क्षेत्रातील ६०% -७०% भूजल उपश्याच्या वर्गवारीतील गावांतील शेतकऱ्यांची गैर सोय होऊ नये याकरिता भूजल पूनर्भरण उपाय योजना करण्याच्या अटीवर नविन सिंचन विहिर घेण्यास शिफारस करणे बाबत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, संचालनालयाच्या दि. २९/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सूचना दिल्या आहेत.

(३) जागतिक बँक व केंद्र शासन पुरस्कृत अटल भूजल योजनेमध्ये पाणलोट क्षेत्रात भूजल पातळी उंचविण्यासाठी नाशिक जिल्हयातील अतिशोषित (९२), शोषित, (१३) व अंशत: शोषित (२६) क्षेत्रातील गावांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्या अंतर्गत सिन्नर तालुक्यातील ८७ गावांमध्ये, देवळा तालुक्यातील ४० गावांमध्ये व नाशिक तालुक्यातील ०४ गावांमध्ये १९७७ पुनर्भरणाच्या व ३०२ जलसंधारणाच्या उपाययोजना घेण्यात आलेल्या आहेत.

तसेच सिन्नर तालुक्यातील ८७ गावांमध्ये, देवळा तालुक्यातील ४० गावांमध्ये व नाशिक तालुक्यातील ०४ गावांमध्ये १०१९६.२२ हेक्टर मागणी आधारित कामे (पाणी बचतीच्या उपाययोजना) घेण्यात आली आहे. सदर योजना अंतिम टप्प्यात असून योजनेतील शेतकऱ्यांना भूजलाच्या वाढीच्या स्वरुपात झालेल्या लाभाचा अभ्यास याबाबतचे मुल्यांकन प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये एम.आय.डी.सी. प्रकल्प उभा करणेबाबत

**(२०) २२८५ (१७-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये एमआयडीसी प्रकल्प उभा रहावा अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक नागरिकांसह लोकप्रतिनिधी यांचेकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरीता मौजे मेंढापूर, बाभुळगांव, आढीव, गुरसाळे ग्रामस्थांची अंदाजित २००० एकर जमीन व श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची उपलब्ध असलेली ३६७ एकर जमिनींपैकी २५० एकर जमीन एमआयडीसी साठी देणेस श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याचे सर्व सभासद व संचालक मंडळ यांनी दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावातील शेतकरी बांधवासह एमआयडीसी प्रकल्पासाठी देण्यात येणाऱ्या जमिनीचे खातेधारक, गट नंबर व क्षेत्राची माहिती इत्यादी सविस्तर तपशिल प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, सोलापूर यांचेकडे सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पंढरपूर तालुक्यात एमआयडीसी प्रकल्प सुरु करण्याच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२),(३) व (४)प्रस्तावित प्रकल्पाच्या अनुषंगाने संबधित ग्रामपंचायत यांचे ठराव व तसेच श्री विठ्ठल सहकारी साखर कारखानाचा सभासद व संचालक मंडळ यांचे ठराव, सर्व खातेदार यांचे संमतीपत्रे, इतर अनुषंगिक कागदपत्रे प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु म.औ.वि. महामंडळामार्फत सुरु असून, सदर कागदपत्रे प्राप्त झाल्यावर औद्योगिक क्षेत्र उभारणेबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम मधील १९६१ तरतूदी व मऔवि महामंडळाच्या प्रचलित कार्यपद्धतीनुसार धोरणात्मक निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जवळबन (ता.केज, जि.बीड) येथील राजकंस्ट्रक्शन कंपनीला काळ्या यादीत टाकण्याबाबत

**(२१) २३१९ (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जवळबन (ता.केज, जि.बीड) येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारत बांधकामाचे काम जिल्हा नियोजन समिति मधून मंजूर होते व राज कंस्ट्रक्शन कंपनी, केज यांना दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास सदर कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले होते हे खरेआहे काय,
(२) असल्यास, सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिल्यापासून १८० दिवसांचा कालावधी होता परंतू कंत्राटदाराने काम मुदतीत सुरु न केल्याने कामाचा निधी दुप्पट (लॅप्स) झाला आहे, हे ही खरेआहे काय,
(३) असल्यास, उक्त काम सुरु करणेबाबत उपअभियंता, जि.प.बांधकाम विभाग, केज. यांनी नोटीस दिली असतानाही राज कंस्ट्रक्शन कंपनीने दुर्लक्ष करुन काम केले नसल्यामुळे सदर कंपनीवर त्वरित कार्यवाही करून त्यांना काळ्या यादीत टाकणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड. व मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. यांचेकडे दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने शासनाने सदर कंपनीवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२६-०६-२०२५) :** (१), (२) व (३) जवळबन (ता. केज, जि. बीड) येथील पशुवैद्यकीय दवाखाना इमारतीच्या बांधकामास जिल्हा नियोजन समितीमधून मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. तथापि, प्रस्तुत कामास कार्यारंभ देण्यात आला असून सदरचे काम संबंधित कंत्राटदाराने पुर्ण केले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धावडी (ता. अंबाजोगाई, जि.बीड) येथे जलजीवन मिशन पाणी पुरवठा योजनेंतर्गत विहिरीचे पाणी शेतीसाठी वापरण्यास प्रतिबंध घालणेबाबत

**(२२) २३२० (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धावडी (ता. अंबाजोगाई, जि.बीड) येथे जलजीवन मिशन पाणी पुरवठा योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या विहिरीचे पाणी गावातील नागरिकांना पिण्यासाठी वापरण्याऐवजी सदर गावातील काहीजण स्वतः च्या शेतीसाठी वापर करुन सरकारी विहिरीच्या पाण्याचा गैरवापर करत असल्याची तक्रार श्री.सुभाष सखाराम घुले यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती अंबाजोगाई यांच्याकडे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासकीय विहिरीच्या पाण्यावरून भविष्यात वाद निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे असल्यामुळे संबंधितावर त्वरित कार्यवाही करून शासकीय विहिरीतील पाणी वापरण्यास प्रतिबंध घालण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड. व मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. यांचेकडे दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार शासकीय विहिरीतील पाणी वापरण्यास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१२-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) बीड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत उपविभागीय स्तरावर चौकशी करण्यात आली असून जल जीवन मिशनच्या उद्भव विहिरीवरुन शेतकरी पाण्याचा गैरवापर करीत नसल्याचे स्थळपाहणीत आढळून आले आहे. तसेच, ग्रामपंचायतीमार्फत उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे तात्पुरते पंप बसवून जवळ असलेल्या केंद्रेवस्ती व सुरवसे वस्तीला पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**समाजातील बालकांसाठी बाल धोरण आणि कृति आराखडा तयार करणेबाबत**

**(२३) २३९७ (२४-०४-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)समाजातील सर्व स्तरांतील बालकांना निरोगी, आनंदी, सुरक्षित आणि सक्रिय वातावरण मिळावे यासाठी शासनाकडून बाल धोरण आणि कृति आराखडा सन २०२२ मध्ये तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बालधोरणाच्या मसुद्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, यात कोणकोणत्या तरतूदी करण्यात आल्या आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२०-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) बाल धोरणाचा थोडक्यात मसुदा पुढीलप्रमाणे आहे:- मुख पृष्ठ, विषय पृष्ठ, संदर्भ, उदिष्टे आणि मार्गदर्शक तत्वे, धोरण आणि सल्लागार प्रक्रीयाबाबत, थिमॅटीक फोकस क्षेत्रे, आरोग्य कल्याण आणि पोषण, शिक्षण आणि विकास, बाल संरक्षण, बालकांचा सहभाग, आर्थिक, सामाजिक आणि इतर असुरक्षा या कारणामुळे बहिष्काराचा सामना करणारी बालके, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व अल्पसंख्याक समाजातील बालके, शहरी गरीब समुदयातील बालके, मोसमी बदलामुळे स्थलांतर बाधीत मुलांसह रस्त्यावरील परिस्थितील व फिरतीवर असलेली बालके, दिव्यांग बालके, तृतीयपंथी बालके, समलैंगीक मुली व मुले, असामान्य जन्मजात विकृती आणि अलैंगिक बालके, आपत्ती व वातावरण बदलामुळे प्रभावित बालके, संस्थात्मक यंत्रणा, संसाधन व्यवस्थापन इत्यादी विषय सदर बालधोरणामध्ये समाविष्ट आहेत.

(३) बाल धोरणामध्ये १) आरोग्य, पोषण व कल्याण २) शिक्षण व विकास ३) बाल संरक्षण ४) बालकांचा सहभाग तसेच उपेक्षित गटातील बालके ५) अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व अल्पसंख्याक समाजातील बालके ६) शहरी गरीब समुदयातील बालके ७) मोसमी बदलामुळे स्थलांतर बाधीत मुलांसह रस्त्यावरील परिस्थितील व फिरतीवर असलेली बालके ८) दिव्यांग बालके ९) तृतीयपंथी बालके यांचा समावेश आहे. प्रस्तुत बाल धोरण हे चार विषनिहाय क्षेत्रे प्रतिबिंबीत करते व बालकांच्या एकुण पाच असुरक्षित श्रेणी ओळखून त्याकडे शासनाचे लक्ष केंद्रीत करण्यास मदत करते. यामध्ये आपत्ती व हवामान बदलामुळे बाधित बालकांसाठी तरतुदी व कृती आराखडा हा देखील भाग आहे.

बाल धोरणामध्ये उपरोक्त नमूद समाजातील विविध घटकामधील बालकांचा समावेश असून त्यांचे योग्य प्रकारे विकास, आरोग्य, शिक्षण, बाल संरक्षण, बाल सहभाग, पुनर्वसन व एकूणच सर्वागिण विकास होण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली कार्यवाही, सदर कार्यवाही करीता लागणारा कालावधी कार्यवाही दरम्यान निदर्शनास आलेली निरिक्षणे या बाबी समाविष्ट असून कृती आराखड्यानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी ही संबंधित विभाग व सहयोगी विभाग यांचेवर निश्चित करण्यात आलेली आहे.

---

## धाराशिव येथील हवाई धावपट्टीची देखभाल दुरुस्ती करणेसह इमारतीमध्ये सोयी-सुविधा निर्माण करणेबाबत

**(२४) २४८० (१७-०४-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव येथील एमआयडीसीच्या माध्यमातून रिलायन्स कंपनीकडे देण्यात आलेल्या हवाई धावपट्टीचे देखभाल दुरुस्ती व अस्तित्वात असलेल्या इमारतीमध्ये सोयी सुविधा निर्माण करणे तसेच हवाई धावपट्टीची लांबी वाढविण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाराशिव येथील रिलायन्स कंपनीकडे भाडेतत्त्वावर दिलेल्या विमानतळ परत एमआयडीसीला घेण्यासाठी रिलायन्स कंपनी नोटीस देण्याचा दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय झाला असून त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, विमानतळाची हवाई धावपट्टीची लांबी कमी असल्याकारणाने बऱ्याच वेळा येणारे विमान दुसरीकडे उतरावे लागत असल्याने येथील हवाई धावपट्टीची लांबी १६०० मीटर वरुन २८०० मीटर पर्यंत वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी यांना माहे जून,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान सूचना केल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धाराशिव येथील भाडेतत्त्वावर रिलायन्स कंपनीकडे असलेले विमानतळ परत एमआयडीसीच्या ताब्यात घेऊन हवाई धावपट्टीची लांबी वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२),(३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या लातूर प्रादेशिक कार्यालयाकडून मे. उस्मानाबाद एअरपोर्ट प्रा.लि. यांना दि.१७/०१/२०२५ रोजी करारनामा संपुष्टात आण्याबाबतची नोटीस (Termination Notice) देण्यात आली होती. तद्नंतर मऔवि महामंडळ प्रादेशिक कार्यालय, लातूर यांच्या दि.०८.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मे.रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स प्रा.लि. यांना (Resumption Order and Termination of Lease Notice) नोटीस देवून सदरचे विमानतळ दि.०८.०४.२०२५ रोजी पुनश्च मऔवि महामंडळाच्या ताब्यात घेण्यात आले आहे.

धाराशिव येथील हवाई धावपट्टीचे देखभाल दुरुस्तीचे काम मे. उस्मानाबाद एअरपोर्ट प्रा.लि. यांचेकडून केले जात होते. तथापि, सध्या सदरचे विमानतळ दि.०८.०४.२०२५ रोजी पुनश्चः मऔवि महामंडळाच्या ताब्यात घेण्यात आले असून, सदर विमानतळ महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (MADC) यांना देखभाल दुरुस्ती व परिचालनाकरीता हस्तांतरीत करण्याची पुढील कार्यवाही मऔवि महामंडळाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळत असल्याबाबत

**(२५) २४९७ (२४-०४-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २७,९२० ग्रामपंचायती असून ४६६९ कुशल, २५२८५ अर्धकुशल व १८३४५ अकुशल असे ४८२९९ कर्मचारी लिपिक, पाणीपुरवठा, शिपाई, दिवाबत्ती, सफाई कर्मचारी अशा विविध पदांवर काम करतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांना ११ हजार ६२५ ते १४ हजार १२५ रुपये किमान वेतन लागू असून लोकसंख्येच्या प्रमाणात कुशल, अर्धकुशल व अकुशल कर्मचाऱ्यांना १००, ७५ व ५० टक्के अत्यल्प वेतन मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा निधी जिल्हा परिषदेकडे वर्ग होत असल्याने माहे जून, २०२४ पासून ऑनलाईन वेतन मिळणे बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने या कर्मच्याऱ्यांना वेतन वेळेत मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (११-०६-२०२५) :** (१) होय,हे खरे आहे,

ERP प्रणालीनुसार सद्यस्थितीत कुशल-४६६४, अर्धकुशल-१८९८०, व अकुशल-२४८८५ असे ४८५२९ विविध पदावर नोंदणीकृत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची संख्या आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे,

ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.२२ जून,२०२२ अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना रु.११,६२५ ते १४,१२५ किमान वेतन कुशल, अर्धकुशल व अकुशल वर्गवारी व परिमंडळ नुसार लागू आहे तसेच ग्राम विकास विभाग शासन निर्णय दि.०४ मार्च,२०१४ व दि.१७ सप्टेंबर,२०१८ अन्वये ग्रामपंचायतीची लोकसंख्या, उत्पन्न व ग्रामपंचायतीच्या सर्व करांच्या वसुलीच्या प्रमाणात वेतनाच्या १०० टक्के,९० टक्के, ७० टक्के व ५० टक्के शासन हिस्सा अनुद्येय असून उर्वरित वेतन ग्रामपंचायतस्तरावरून देण्यात येते.

(३) होय,हे खरे आहे,

(४) शासन पत्र क्र. व्हीपीएम-२०२४/प्र.क्र.१०२/पंरा-३ दि.०१/०८/२०२४ अन्वये ERP प्रणाली पूर्वीप्रमाणे सुरळीत होईपर्यंत सरपंच,उपसरपंच मानधन, ग्रा.प.कर्मचारी वेतनासाठी सहायक अनुदान व भविष्य निर्वाह निधी रक्कम जिल्हा परिषद यांना वितरीत करून जिल्हा परिषद मार्फत संबंधितांना अदा करण्यास शासनाने मान्यता दिली असून माहे जुलै,२०२४ पासून जिल्हा परिषद मार्फत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दरमहा वेतन,भ.नि.नि.रक्कम अदा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे जळकेवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील अंगणवाडी शाळेच्या अनधिकृत बांधकामाबाबत

**(२६) २५०० (२४-०४-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जळकेवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील गट नं.३८६ व ३८७ वर अंगणवाडी शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गट नं. ३८६ व ३८७ हा स्कुल पंच कमिटीच्या ७/१२ च्या नावे असलेल्या जागेवर असून अंगणवाडी शाळेच्या इमारतीचे अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बांधकाम कोणत्या योजनेतंर्गत व केव्हा मंजूर करण्यात आले आहे, तसेच, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या संदर्भात ग्रामपंचायत, जळकेवाडी यांनी सदर जागेवर अंगणवाडी शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यासंदर्भात ना हरकत ठराव मंजूर करण्यात आला आहे काय,असल्यास,सदर ठराव केव्हा मंजूर करण्यात आला,
(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे (१३-०५-२०२५) :** (१) सदर बांधकाम सन २०१५-१६ मध्ये जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधुन मंजुर करण्यात आलेले आहे.
(२) व (३) ग्रामपंचायतीच्या मालकीची अन्य जागा उपलब्ध नसल्याने व सदर जागा सोयीच्या ठिकाणी असल्याने स्कुल पंच कमिटीच्या नावे ७/१२ असलेल्या गट नंबर ३८७ मधील जागेवर अंगणवाडीचे बांधकाम करण्यात आलेले आहे.
(४) व (५) या संदर्भात ग्रामपंचायत जळकेवाडी यांचेकडून ठराव क्र.१०/१ दिनांक ०४.०१.२०१६ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे.

---

## श्री. वडमाऊली देवस्थान (ता. केज, जि. बीड) "ब" वर्ग दर्जा प्राप्त या ग्रामीण तीर्थक्षेत्राला निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(२७) २५७४ (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री. वडमाऊली देवस्थान, (वड) (ता. केज, जि. बीड) या ग्रामीण तीर्थक्षेत्राला शासनाने "ब" वर्ग दर्जा दिला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मतदारसंघातील एकूण ०४ 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणांच्या विकासासाठी, भक्तांना मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी, विविध विकास कामे करणेसाठी निधी उपलब्ध करून देण्याबातची मागणी मुख्यकार्यकारीअधिकारी, जि.प. बीड. यांनी त्यांचे पत्र.क्र. ४२३ दि. १५ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर प्रकरणी ०३.०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर मागणीच्या अनुषंगाने निधीस मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१८-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) श्री.वडमाऊली देवस्थान, (वड) (ता. केज, जि. बीड) या तिर्थक्षेत्रास दि. ३१.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू. १ कोटी ९७ लक्ष ची प्रशासकीय मान्यता देऊन प्रशासकीय मान्यतेच्या १०% निधी वितरीत केला आहे. त्यानंतर दि.०१.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यतेची उर्वरीत रक्कम रू. १ कोटी ७८ लक्ष वितरीत करण्यात आली आहे.

श्री. क्षेत्र तांबवेश्वर देवस्थान तांबवा ता. केज जि. बीड या तिर्थक्षेत्रास दि. ०७.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू. ४२५.०० लक्ष ची प्रशासकीय मान्यता देऊन प्रशासकीय मान्यतेच्या १०% निधी वितरीत केला आहे. उर्वरित निधी कामाच्या प्रगतीनुसार मागणी केल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

श्री. सिध्दिविनायक देवस्थान कुंबेफळ ता. केज जि. बीड या तिर्थक्षेत्रास दि. ०७/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू. ३००.०० लक्ष ची प्रशासकीय मान्यता देऊन प्रशासकीय मान्यतेच्या १०% निधी वितरीत केला आहे. उर्वरित निधी कामाच्या प्रगतीनुसार मागणी केल्यानंतर वितरीत करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर भाषेच्या संवर्धन व विकासासाठी निधी मागणीचा प्रस्ताव करणेबाबत

**(२८) २६१६ (२४-०४-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय सांस्कृतिक मंत्र्यांच्यावतीने चार महिन्यांपूर्वी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अद्याप शासनाने शासन निर्णय काढलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर त्या भाषेच्या संवर्धन व विकासासाठी केंद्र शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त होतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानंतर राज्यातील ज्येष्ठ साहित्यिक व तज्ञांची चर्चा करून निधीची रक्कम आणि विनियोगाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे राज्य शासनाच्या वतीने सादर करण्यात आला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२६-०५-२०२५) :** (१) होय,
(२) केंद्र शासनाच्या दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. त्याबाबत संस्कृती मंत्रालयाने दि. ४ ऑक्टोबर, २०२४ रोजी अधिसूचना क्र. फा.सं- एकेडी-२६/२/२०१९/ अकादमी निर्गमित केली असल्याने स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही.
(३) मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर केंद्र शासनाकडून क्रमप्राप्त असलेले लाभ मिळविणे तसेच भाषेचा प्रचार, प्रसार व संशोधन अपेक्षित आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनास प्रकल्प प्रस्ताव पाठविणे क्रमप्राप्त आहे. अभिजात भाषेच्या विकासासाठी राज्य शासनाने केलेली प्रगती विचारात घेऊन केंद्र शासन अनुदान उपलब्ध करुन देते.
(४) तसेच कोणते प्रकल्प प्रस्तावकेंद्र शासनास पाठवावेत, त्यात कोणत्या बाबींचा समावेश असावा, यासाठीच्या मार्गदर्शनाकरिता ज्येष्ठ साहित्यिक व तज्ज्ञांची समिती गठीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(५) लागू नाही.

---

## राज्यातील आधार केंद्र चालकांवर येणारे बेरोजगारीचे संकट टाळण्याबाबत

**(२९) २७२४ (२४-०४-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिला व बालकल्याण विभाग मार्फत Maha IT (Maharashtra Information Technology pvt Ltd) या शासकीय कंपनीमार्फत सुरू असलेले राज्यातील १६५९ आधार केंद्र हे ITI Ltd व RailTail corporation Ltd या केंद्र सरकार संलग्नित कंपन्यांकडे हस्तांतरित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे जे वर्तमान आधार केंद्र चालक (Village Level Entrepreneur)आहेत त्यांच्यावर बेरोजगारीचे संकट येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१३-०५-२०२५) :** (१), (२), (३) व (४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यातील ५५३ प्रकल्पांकरिता प्रत्येक ३ याप्रमाणे १६५९ आधार नोंदणी संच उपलब्ध करुन देण्यात आले होते. महाआयटी (महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ) या संस्थेला सदर आधार नोंदणी संचाद्वारे राज्यातील सर्व ३६ जिल्हयांमध्ये आधार नोंदणी एजन्सीचे काम देण्यात आले होते.

त्यानुसार महाआयटीने मनुष्यबळ नियुक्त केले होते. तथापि, केंद्र शासनाच्या सूचनेनुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील लाभार्थ्यांची आधार नोंदणी तात्काळ होणे आवश्यक होते. परंतु, महाआयटीकडून सदर काम संथगतीने होत असल्याने राज्यातील एकूण ३६ जिल्ह्यांपैकी १८ जिल्ह्यांचे कामकाज ITI Ltd या संस्थेकडे देण्यात आले आहे. उर्वरित १८ जिल्ह्यांचे काम RailTel Corporation Ltd या संस्थेकडे देण्यात आले आहे.

---

## वरूड, मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रात अत्यंत निकृष्ट दर्जाचे पोषण आहाराचे वाटप केल्याबाबत

**(३०) २८२२ (२४-०४-२०२५). श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरूड, मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रात अत्यंत निकृष्ट दर्जाचे पोषण आहाराचे वाटप केले जात असल्याने याबाबत वितरणासाठी नियुक्त केलेल्या कंत्राटदारांचा दर्जा शासनाकडून तपासला जातो काय,

(२) असल्यास,या संदर्भात अमरावती जिल्ह्याच्या संबंधित विभागांनी तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदारांद्वारे दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराच्या गुणवत्तेची पाहणी करण्याचे निकष काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या संदर्भात अमरावती जिल्ह्याच्या संबंधित विभागांनी केलेल्या तक्रारींसंबंधात कारवाई करणे तसेच पोषण आहार सुनिश्चित व वितरण प्रणालीत सुधारणा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१४-०५-२०२५) :** (१), (२) व (३) पुरक पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी नियुक्त केलेल्या पुरवठाधारकांमार्फत घरपोच आहाराचा पुरवठा करण्यापूर्वी National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories मार्फत सदर आहाराच्या नमुन्याची तपासणी करण्यात येते. तद्नंतर, घरपोच आहाराचा पुरवठा करण्यात येतो. तसेच, घरपोच आहाराचा पुरवठा अंगणवाडी स्तरावर झाल्यानंतर जिल्हा कार्यक्रम अधिकारी किंवा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत सदर आहाराची रॅन्डमली तपासणी करण्यात येते. तसेच, महिला बचत गट/मंडळ यांचे मार्फत होणारा गरम ताजा आहाराचा पुरवठा झाल्यानंतर अंगणवाडी स्तरावर स्थापित केलेल्या माता समिती मार्फत सदर आहाराचा दर्जा तपासला जातो. तसेच, बाल विकास प्रकल्प कार्यालयाकडून सदर आहाराची NABL लॅबमध्ये रॅन्डमली तपासणी करण्यात येते.

अमरावती जिल्हयाच्या संबधी प्रयोगशाळा तपासणी अहवालानुसार आहार लाभार्थ्यांना खाण्यायोग्य असल्याचे अभिप्राय प्राप्त आहेत.

(४) घरपोच आहार पुरवठा ज्या दोन महिन्यांच्या कालावधीकरिता होणार आहे, त्या कालावधीची सुरूवात होण्यापूर्वीच घरपोच आहार पुरवठा पूर्ण झाला आहे किंवा नाही याची खात्री सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांचेकडून केली जाते. तसेच दर दिवसाला गरम ताजा आहार विहीत वेळेत लाभार्थ्यांना खाऊ घातला जात असल्याबाबतची देखील खात्री केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयाच्या जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपाधारक उमेदवार नोकरीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत**

**(३१) ३०३१ (१६-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील जिल्हा परिषदेमध्ये १५५ अनुकंपाधारक उमेदवार नोकरीच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ च्या यादीनुसार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील काही अनुकंपाधारकांची वयोमर्यादाही ओलांडून जाण्याची शक्यता असल्याने ते आर्थिक विंवचनेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त अनुकंपाधारकांना सेवेत तातडीने सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०९-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. सदर यादीतील २ उमेदवारांची ४५ वर्ष वयोमर्यादा सन २०२८ मध्ये संपणार आहे.

(३) जिल्हा परिषद, जळगांव अंतर्गत सन २०१९ ते सन २०२४ अखेर अनुकंपा धारकांच्या प्रतिक्षा यादीनुसार ३४१ अनुकंपा धारक उमेदवारांची नियुक्ती केली आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर एकूण १५५ उमेदवार प्रतिक्षासूची मध्ये आहेत. प्रतिक्षासूचीतील अनुकंपा धारकांना शैक्षणिक अर्हतेप्रमाणे गट-क व गट-ड संवर्गात सेवेत सामावून घेण्यासाठी शासन नियमानुसार जिल्हा परिषदेमार्फत अनुकंपा नियुक्तीची कार्यवाही विहित मुदतीत व काटेकोरपणे करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यातील सिल्लोड येथे स्टार्च उद्योगाला पुनर्जीवित करणेबाबत**

**(३२) ३१५७ (१७-०४-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील सिल्लोड येथे स्टार्च उद्योग सूरु करण्याची किंवा **पुनर्जीवित** करण्याची बाब यापूर्वी शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्टार्च उद्योग सुरु करण्याकरीता अथवा सदर उद्योगाच्या **पु**नर्जीवितसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२६-०६-२०२५) :** (१) नाही.

(२) व (३) सिल्लोड तालुक्यात फूड, स्टार्च व स्टार्च प्रोडक्टस उत्पादन करणाऱ्या सुक्ष्म उद्योग घटकांची संख्या ६ असून त्यातील गुंतवणूक रु.८०.०० लक्ष व १ लघु उद्योग घटक नोंदणीकृत असून त्याची गुंतवणूक रु.९०.०० लक्ष एवढी आहे.

सिल्लोड तालुका व परिसरात मका उत्पादन मोठया प्रमाणात घेतले जात असून सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात सिल्लोड तालुक्यात ४० ते ४५ हजार हेक्टर वर मका उत्पादन घेतले आहे.

जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून मकावर आधारित स्टार्च उद्योगासाठी सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गंत प्रोत्साहने दिली जातात. तसेच स्टार्च उद्योग हा कृषिपूरक प्रक्रिया उद्योग असल्याने सदर उद्योगासाठी विशेष प्रोत्साहने लागू आहेत.

---

## मृद व जलसंधारण विभाग (जि.नांदेड) अंतर्गत जलसंधारणाच्या कामांसाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(३३) ३१७५ (१९-०४-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत जलसंधारणाशी संबंधीत सुमारे रु.७४.५४ कोटी इतक्या किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामांकरिता मंजूर झालेल्या रक्कमेपैकी अद्यापपर्यंत केवळ रु.४.३९ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यातील पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता प्रलंबित कामे तातडीने पूर्ण होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने सदरहू अप्राप्त निधी तात्काळ उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०३-०६-२०२५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) मंजूर एकूण ३० योजना सिंचनाकरीता असून त्यापैकी ४ कोल्हापूरी बंधारे भौतिकदृष्टया पुर्ण असून येत्या उन्हाळयात स्थानिक गावकरी व शेतकरी यांचा पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यास मदत होईल. तसेच उर्वरित योजना प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अंगणवाड्यांमधील मुलांना शुध्द पाण्याचा पुरवठा तसेच आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३४) ३२०९ (२५-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३,५९५ अंगणवाड्यांमधील लहान मुलांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आरओ युनिट आणि करमणुकीची साधने बसविण्यासाठीच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भावी पिढीच्या सुदृढ आयुष्यासाठी अंगणवाड्यातील लहान मुलांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आर ओ युनिट बसविणे तसेच आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१३-०५-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) सक्षम अंगणवाडी या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत प्रति अंगणवाडी रु.१.०० लक्ष (केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०%) इतक्या खर्च मर्यादत अंगणवाडी केंद्रांचे श्रेणीवर्धन करण्यात येते. त्याकरिता केंद्र शासनाने खालील बाबी निश्चित केलेल्या आहेत. :-

| बाब | खर्चाचे निकष |
|---|---|
| पोषण वाटिका | रु.१०,०००/- |
| रेन वॉटर हार्वेस्टिंग | रु.१६,०००/- |
| आर.ओ. युनिट | रु.१०,०००/- |
| एल.ई.डी. | रु.२५,०००/- |
| अदर इन्फ्रास्ट्रक्चर | रु.३९,०००/- |
| **एकूण** | रु.१,००,०००/- |

त्यानुषंगाने राज्यातील १३५९५ स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रांमध्ये वरीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबवून पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

(३) व (४) सद्यस्थितीत राज्यातील ९०८०५ अंगणवाडी केंद्रांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे. सक्षम अंगणवाडी योजनेव्यतिरिक्त सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात १७२५४ अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सबंधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास) / बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना प्रति अंगणवाडी रु.१७,०००/- प्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर विहित प्रक्रिया राबवून पिण्याच्या पाण्याची साठवणूक व्यवस्था, पाण्यासाठी स्वतंत्र टाक्या आणि जलशुद्धीकरण यंत्रणा बसविण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत किमान ३% राखीव निधी कायम स्वरूपी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्याअंतर्गत अंगणवाडी केंद्रांना नलिकेद्वारे पाणीपुरवठा, पाणी साठवणूक व पाणी शुद्धीकरण संयत्र बसविणे याबाबतचे प्रावधान आहे. तसेच, जलजीवन मिशन या योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्रांपर्यंत पिण्याच्या पाण्याच्या नळ जोडणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

---

**करमाळा (जि.सोलापूर) पंचायत समिती कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामास मंजुरी मिळणेबाबत**

**(३५) ३४३२ (१८-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) पंचायत समिती कार्यालयाची इमारत जूनी झाली असून पावसाळ्यामध्ये गळत असल्याने कार्यालयातील अभिलेखे नष्ट होण्याच्या मार्गावर असून याठिकाणी कार्यरत स्थानिक अधिकारी, कर्मचारी, नागरिकांचीही प्रचंड गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी पंचायत समिती करमाळा येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत विभागाच्या मंत्र्यांकडे पत्राद्वारे मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०५-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) पंचायत समिती, करमाळा (जि. सोलापूर) येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामाचा परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यावर यांसदर्भात निधी, निकष, प्राथम्य क्रमानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील चेंबूर येथील दि चिल्ड्रेन्स होम व्यवस्था आणि सुविधांच्या उपलब्धतेबाबत

**(३६) ३४४९ (२४-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर येथील दि चिल्ड्रेन्स होमकडे असलेल्या एकूण जागेतील किती भाग प्रत्यक्ष वापरात आहे आणि उर्वरित जागेचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करण्यासाठी कोणती योजना तयार करण्यात आल्या आहेत,

(२) असल्यास, संस्थेत राहणाऱ्या मुलांची संख्या वाढवण्यासाठी आणि त्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नव्या इमारती, निवासगृहे किंवा प्रशिक्षण केंद्रे उभारण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(३) असल्यास, अधिक मुलांना निवासाची सोय व्हावी यासाठी संस्थेच्या जागेचा सुयोग्य वापर करून नवीन डॉर्मिटरी किंवा बहुमजली निवास संकुल उभारणे, शिक्षण, कौशल्यविकास आणि मानसिक विकासासाठी संस्थेच्या परिसरात अतिरिक्त सुविधा जसे की व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे, वाचनालय, तांत्रिक शिक्षणासाठी कार्यशाळा इत्यादीकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) असल्यास, संस्थेच्या एकूण जागेचा सर्वोत्तम वापर सुनिश्चित करणे, जागेवर झालेल्या अतिक्रमणाच्या पुनर्प्राप्तीसाठी उपाययोजना करणे याबाबतची अंमलबजावणी कोणत्या वेळापत्रकानुसार केली जाणार आहे, तसेच, विकास आराखडा-२०३४ मध्ये सार्वजनिक वापरासाठी विविध जागेवर झालेल्या अतिक्रमणाच्या पुनर्प्राप्तीसाठी आरक्षित केलेल्या जागांचा विकास करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०६-०६-२०२५) :** (१) राज्य शासनाने दि चिल्ड्रेन्स एड सोसायटीस प्रदान केलेल्या ५५ एकर ४ गुंठे ४ आणे जमीनीपैकी ३२ एकर ४ गुंठे आणि ४ आणे जमीन प्रत्यक्ष वापरात आहे.

दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, मुंबई संचलित बालकांच्या संस्थांचे इमारतींचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ व सुधारीत २०२१ व महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील नमूद तरतुदीतील योजनेनुसार जागेचा वापर करण्यात येतो.

(२) व (३) तत्का. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, मुंबईच्या नियामक परिषदेची सभा दि.१२.०२.२०२४ रोजी संपन्न झाली.

सदर सभेमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, मुंबई संचलित बालकांच्या संस्थांचे इमारतींचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, १५ व नियम, २०१८ मधील तरतुदीनुसार पुर्नविकास तसेच शासकीय कार्यालय व संस्थांच्या इमारती उभारण्यासाठी शासन व सोसायटीमार्फत संयुक्तपणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार तथा वास्तुविशारद यांची नेमणूक करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच महिला व बाल विकास विभाग अंतर्गत महिला व बाल विकास भवन, एकात्मिक बाल विकास योजना, महिला आर्थिक विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोग, महाराष्ट्र राज्य, महिला आयोग, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ इत्यादी प्रकल्प सोसायटीच्या मोकळया जागेवर उभारण्याकरीता शासन निर्णय दि.११.१०.२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर प्रकल्पाकरीता जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) शासनाचे महिला व बाल विकास विभाग व दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, मुंबई यांच्या संयुक्तपणे घेतलेल्या निर्णयानुसार सोसायटीच्या मानखुर्द येथील जागेचा विकास करण्यासाठी सोसायटीच्या मानखुर्द येथील अतिक्रमणा खालील व शासन जमा झालेल्या ९८३४१.२ चौ. मि. (२४.३०० एकर) जागा पुर्नप्राप्तीसाठी सोसायटीच्या वतीने मा.मंत्री महसूल, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अपील दाखल केले असून सदर अपील प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) पंचायत समितीच्या नवीन सुसज्ज इमारत बांधकामासाठी निधी मंजूर होणेबाबत**

**(३७) ३४९१ (१८-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) पंचायत समितीच्या नवीन सुसज्ज इमारत बांधकामासाठी निधी मंजूर होणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मा.ग्रामविकास मंत्री यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०५-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) निवेदनाच्या अनुषंगाने पंचायत समिती, दौंड (जि. पुणे) येथील प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर यांसदर्भात निधी, निकष, प्राथम्य क्रमानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

---

**मौजे खोर देऊळगाव गाडा (ता.दौंड, जि.पुणे) परिसरात प्रस्तावित**
**नवीन औद्योगिक वसाहत स्थापन करणेबाबत**

**(३८) ३४९२ (१७-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खोर–देऊळगाव गाडा (ता.दौंड, जि.पुणे) परिसरात नवीन औद्योगिक क्षेत्र प्रस्तावित असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे त्याचे तांत्रिक सर्वेक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी नवीन औद्योगिक वसाहत स्थापन करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार, मौजे खोर–देऊळगाव गाडा येथे नवीन औद्योगिक वसाहत स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तावित खोर-देऊळगाव गाडा, ता.दौंड,जि.पुणे येथील ७५५.०० हेक्टर क्षेत्रासाठी दि.२३.०१.२०२५ रोजी तांत्रिक सर्व्हेक्षण (Digital Satellite Contour Survey) करण्यात आला आहे. सदर क्षेत्रापैकी काही क्षेत्र उचं , सखल असून औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेसाठी योग्य नसल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि, उपरोक्त ठिकाणी नवीन औद्योगिक वसाहत स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१८.१२.२०२४ रोजी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने जागेची उपलब्धता, औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याच्या दृष्टीने तांत्रिक सुसाध्यता, आर्थिक सुसाध्यता, उद्योजकांची मागणी या सर्व बाबी विचारात घेऊन प्रस्ताव सादर करणेबाबत प्रादेशिक अधिकारी, मऔवि महामंडळ, बारामती यांना मऔवि महामंडळाच्या मुख्यालयाकडून कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम,१९६१ मधील तरतुदीनुसार भूसंपादनाची पुढील कार्यवाही मऔवि महामंडळाकडून करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील अवर्गीकृत रस्ते विकास योजनेत समाविष्ट करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

**(३९) ३४९३ (१८-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील अवर्गीकृत रस्त्यांचे ग्रामीण मार्ग म्हणून वर्गीकरण करून रस्ते विकास योजनेत समाविष्ट करण्यासाठीचा प्रस्तावास मान्यता मिळण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०२४ व जानेवारी २०२५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांचा समावेश रस्ते विकास योजनेत करण्याबाबतचा प्रस्ताव ग्रामविकास विभागास सादर करण्यात आला असून त्याचा संदर्भ क्रमांक क्र.रवियो-२०२४/प्र.क्र.३६/बांध–५ व क्र.रवियो-२०२४/प्र.क्र.३७/बांध–५ असा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावांबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने सदर प्रस्तावांना मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१४-०५-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) ग्रामविकास विभागाच्या दि.२४.०२.२०२५ व दि.२४.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दौंड तालुक्यातील (जि. पुणे) योजनाबाह्य/ अवर्गीकृत रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून रस्ते विकास योजना २००१-२१ मध्ये समाविष्ट करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयात कामगार रूग्णालय उभारणेबाबत

**(४०) ३५९३ (०५-०५-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: रायगड जिल्हयात विमाधारक कामगारांची वाढती संख्या लक्षात घेता कामगारांना अधिक चांगले आरोग्य सेवा मिळण्यासाठी कामगार रूग्णालय उपलब्ध नसल्यामुळे कामगारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील कामगारांना उत्तम आरोग्य सेवा मिळण्यासाठी कामगारांसाठी रूग्णालच्या निर्मित्तीसाठी शासन विचारधीन आहे काय ,

(३) असल्यास, सदर कामगार रूग्णालयाच्या निर्मितीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०४-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या राज्य कामगार विमा अधिनियम १९४८ अन्वये श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांच्या अधिपत्या खालील राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या मार्फत राज्य कामगार विमा योजना राबविली जात असून सदर योजने अंतर्गत नोंदणीकृत विमाधारक व लाभार्थ्यांना राज्य शासनामार्फत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते. राज्य कामगार विमा महामंडळाने सन २०१६ मध्ये संपूर्ण रायगड जिल्ह्यात राकावि योजना लागू केली आहे.

(२) होय, सद्य:स्थितीत रायगड जिल्ह्यामध्ये एकूण १,८९,८०६ नोंदणीकृत विमाधारक व सुमारे ७,५९,२२४ लाभार्थी असुन त्यांना वैद्यकीय सेवा पुरविता यावी याकरीता Primary medical care साठी एकूण २८ विमा वैद्यकीय व्यवसायी (I.M.P.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच रायगड जिल्ह्यामध्ये एकूण ०८ राकावियो सेवा दवाखाने सुरू करण्यात आले असून, अतिरिक्त ०७ सेवा दवाखाने सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच विमाधारक व लाभार्थ्यांना Secondary medical care पुरविण्याकरीता रायगड जिल्ह्यात एकूण २१ तसेच Super speciality treatment करीता राकावि महामंडळा मार्फत एकूण ०६ खाजगी रूग्णालयांशी टाय-अप करण्यात आले आहे. त्याचबरोबर राकावि महामंडळाने रायगड जिल्ह्यात पेण, कर्जत, पनवेल व खोपोली अशी ०४ नवीन राकावि रूग्णालये स्थापित करण्यास मान्यता दिली असून त्याकरीता राज्य शासनाकडून राकावि महामंडळास जमीन उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) सद्य:स्थितीत पेण व कर्जत येथील प्रस्तावित राकावि रूग्णालयांसाठी जमीन निश्चित करण्यात आली आहे. पेण राकावि रूग्णालयाकरीता निश्चित करण्यात आलेली जमीन ही केंद्र शासनाच्या DPIIT या विभागाच्या अखत्यारित येत असल्याने सदर विभागाकडून जमीन उपलब्ध करून घेण्याबाबत राकावि महामंडळ नवी दिल्ली यांच्या मार्फत कार्यवाही सुरू आहे. तर कर्जत येथील प्रस्तावित राकावियो रूग्णालयाकरीता निश्चित करण्यात आलेली जमीन ही राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या अखत्यारित असल्याने सदर जमीन उपलब्ध करून देण्याची कार्यवाही महसूल व विभागामार्फत करण्यात येत आहे.

पनवेल येथील प्रस्तावित राकावि रूग्णालयासाठी सिडकोच्या अखत्यारितील जमीन निश्चित करण्यात आली असून सदर जमीन उपलब्ध करून घेण्यास शासनाच्या नगर विकास विभागाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. तर खोपोली येथील प्रस्तावित राकावि रूग्णालयाकरीता जमीन उपलब्ध करून देण्याबाबत महसूल व वन विभागास विनंती करण्यात आली असुन, अद्याप त्याठिकाणी जमीन उपलब्ध झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एरंडोल ( जि.जळगांव) येथे औद्योगिक क्षेत्र (MIDC) स्थापन करणेबाबत**

**(४१) ३७८५ (२४-०४-२०२५). श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एरंडोल (जि.जळगांव) येथे औद्योगिक क्षेत्र (MIDC) स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री, उद्योग यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियोजित एरंडोल औद्योगिक क्षेत्र (MIDC) स्थापन करण्यासाठी आवश्यक भूसंपादन करण्याबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक अधिकारी कार्यालय, धुळे यांचेकडून दिनांक १५ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास मा.महाव्यवस्थापक (भुसंपादन), म.औ.वि. म.मुख्यालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने भूसंपादन करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत स्थळ पाहणी करण्यात आलेली आहे काय,

(५) असल्यास, नियोजित एरंडोल औद्योगिक क्षेत्राची (MIDC) स्थापना केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२५) :** (१) व (२) एरंडोल (जि.जळगांव) येथे प्रस्तावित औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी प्रादेशिक कार्यालयामार्फत दि.३०/१२/२०१२ रोजी प्रस्ताव मऔवि महामंडळाच्या मुख्यालयास प्राप्त झाला होता.

(३), (४) व (५) उक्त प्रस्तावाचे अनुषंगाने प्रस्तावित क्षेत्राची भूनिवड समितीमार्फत दिनांक ०१/०२/२०१३ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली. त्यानुषंगाने दि. ०१/१०/२०१३ रोजी प्रस्तावित क्षेत्रास मऔवि अधिनियम १९६१ अन्वये प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करणेस उच्चाधिकार समितीच्या ७४ व्या बैठकीत मंजूरी प्रदान करण्यात आली होती.

दरम्यान, उच्चाधिकार समितीच्या १२१ व्या बैठकीत अधिसुचित / विनाअधिसुचित करण्यास शासन' मान्यता प्राप्त असलेल्या अथवा नसलेल्या प्रकरणांकरीता बक्षी समितीच्या शिफारशीनुसार उच्चाधिकार समितीसमोर सादर करावयाच्या सर्व प्रकरणांबाबत अंतिम निर्णय घेणेकरीता मऔवि महामंडळाचे भूनिवड समितीमार्फत पुनश्च: स्थळ पाहणी

करण्यात यावी असे निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच प्रस्तावित क्षेत्राच्या स्थळपाहणीस बराच कालावधी उलटून गेल्यामुळे सन २०१३ नंतर औद्योगिक क्षेत्राच्या सद्यस्थितीत बदल झाला असल्याची शक्यताही नाकारता येत नाही.

सबब, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, धुळे यांचे कार्यालयामार्फत दिनांक १५.०४.२०२४ रोजीच्या प्राप्त सुधारित प्रस्तावानुसार प्रस्तावित क्षेत्राची सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन), मऔविम यांचे अध्यक्षतेखालील भूनिवड समितीमार्फत स्थळ पाहणी करण्याची कार्यवाही मऔवि महामंडळामार्फत सुरु आहे.

सदर स्थळ पाहणी झाल्यानंतर भूनिवड समितीकडून प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार व महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार पुढील भूसंपादनाची कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

---

**दिवे, कोडीत, चांबळी (ता.पुरंदर, जि.पुणे) या गावातील गायरान जमिनींवर आयटी पार्क उभारणेबाबत**

**(४२) ३७९३ (२४-०४-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवे, कोडीत, चांबळी (ता.पुरंदर,जि.पुणे) या गावातील गायरान जमिनींवर आयटी पार्क उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागा हस्तांतरण व अन्य कार्यवाही तात्काळ करण्याचे आदेश तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक २४ जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास उद्योग व महसूल विभागाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२५) :** (१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दि.१४.०५.२०२४ रोजीच्या पत्रास अनुसरुन आयोजित बैठकीत तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय यांनी जागेची सुसाध्यता तपासून उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

(३) सदर प्रकरणी प्रस्तुत गावांमधील गायरान जमिनीवर आयटी पार्क स्थापन करण्यासंदर्भात मौजे दिवे,कोडीत बु., कोडीत खु. चांबळी या ठिकाणी गायरान जागेची उपलब्धता,सलगता व सुसाध्यता तपासण्याची कार्यवाही मऔवि महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे. जागेची उपलब्धता, आर्थिक सुसाध्यता व उद्योजकांची मागणी तपासून यानुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**कराड (जि.सातारा) तालुका पंचायत समितीची नवीन इमारत बांधणेबाबत**

**(४३) ४२३१ (२४-०४-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुका हा लोकसंख्येच्या दृष्टीने मोठा तालुका असून येथील सध्याची पंचायत समितीची इमारत स्वमालकीची व फारच जुनी असल्याने कामकाजाच्यादृष्टीने अपूरी पडत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पंचायत समितीचे एकूण २४ गट आणि जिल्हा परिषदेचे १२ गट असून पंचायत समिती अंतर्गत एकूण १९ विभागांचे कामकाज चालते तसेच उक्त तालुक्यात कराड दक्षिण, कराड उत्तर व पाटण विधानसभा मतदारसंघातील गावांचा समावेश होत असल्याने सध्या पंचायत समितीच्या विविध विभागांचे कामकाज ५ वेगवेगळ्या ठिकाणी होत आहे त्यामुळे विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांची, अभ्यागतांची, अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पंचायत समितीच्या व्यापक विस्तारामुळे नागरिकांना कामकाजाच्या दृष्टीने सुलभपणे सर्व शासकीय

सेवांचा लाभ घेता यावा याकरीता पंचायत समितीची नवी सुसज्ज प्रशासकीय इमारत उभी करण्याची नितांत आवश्यकता असल्यामुळे शासन स्तरावर पत्रव्यवहार व पाठपुरावा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर नवीन इमारतीच्या उभारणीसाठी श्री दैत्यनिवारणी देवी मंदिराशेजारी जिल्हा परिषदेच्या मालकीची कसबे कराड (ता.कराड, जि.सातारा) येथील स. नं. ७१९ यांचा नवीन स. नं. ४३३ एकूण क्षेत्रफळ ९४.०० गुंठे जागा उपलब्ध असल्याने पंचायत समितीच्या नव्या प्रस्तावित इमारतीचा कृती आराखडा तयार केला आहे हे ही खरे आहे काय,
(५) तसेच, नवीन प्रस्तावित इमारतीच्या ठिकाणी सर्व विभागांची कार्यालये, मासिक मिटींगसाठी एक सभागृह व इतर कार्यक्रमासाठी एक सभागृह, पार्किंग व्यवस्था, विश्रामगृह आदी सोयी-सुविधांसाठी सुमारे रुपये ३५ कोटींच्या निधींची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत मा.ग्रामविकास व पंचायत राज मंत्री यांनी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२६-०६-२०२५) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) पंचायत समिती, कराड (जि. कराड) येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामाचा परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावासंदर्भात निधी, निकष व प्राथम्य क्रमानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौ.पोखरी (घाट) (ता.पाटोदा, जि.बीड) येथे गावच्या हद्दीत असणाऱ्या मायाळा साठवण तलावातून पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईन तोडल्याबाबत

**(४४) ४२९६ (२४-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.पोखरी (घाट) (ता.पाटोदा, जि.बीड) येथे गावच्या हद्दीत असणाऱ्या भायाळा साठवण तलावातून ग्रामस्थांना पाणीपुरवठा करण्यात येत होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावातील ३७ ग्रामस्थ हे ऊसतोड मजूर असून त्यांनी पाईपलाईन टाकण्यासाठी ८ ते १० लाख रुपये खाजगी सावकराकडून व उसनवारीने पैसे घेऊन पाईपलाईसाठी रितसर परवाने घेऊन पाईपलाईन टाकून व पाणीपट्टी भरुनसुध्दा मागील ५ वर्षांपासून पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर गावातील काही अज्ञात समुहाने त्यांच्या पाण्याची मोटर व पाईपलाईन फोडून मोठया प्रमाणात नुकसान केल्याप्रकरणी त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, बीड व तहसीलदार, पाटोदा यांचेकडे करुनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे दिनांक २० मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामस्थांना सुरळीत पाणीपुरवठा करणेबाबत तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१६-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
मौजे पोखरी (घाट) हे गाव बीड तालुक्यातील असून भायाळा साठवण तलावाच्या बुडीत क्षेत्रालगत असणाऱ्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या विहिरीवरुन गावाला पाणी पुरवठा चालू आहे.

(२) कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.०३, बीड यांच्याकडून भायाळा साठवण तलावातून मौजे पोखरी (घाट), जि.बीड या गावातील एकूण ६ शेतकऱ्यांना सन २००८-०९ साली जलाशय उपसा करीता रितसर पाणी परवाने देण्यात आले आहेत. तथापि, मागील ५ वर्षापासून संबंधित शेतकऱ्यांकडून कसल्याही प्रकारची पाणीपट्टी भरुन घेण्यात आलेली नाही.
(३) हे खरे नाही.
असे कोणतेही निवेदन महसुल यंत्रणेकडे प्राप्त नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयात विहिरींच्या अधिग्रहणाद्वारे पाण्याची सोय करणाऱ्यांना मोबदला मिळत नसल्याबाबत**

**(४५) ४३१५ (२४-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयात मागील उन्हाळयात तीन टँकर व ९२ विहिरींच्या अधिग्रहणाद्वारे नागरीकांची तहान भागविणाऱ्यांना अद्याप शासनाकडून आर्थिक मोबदला मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मोबदल्याची ३४ लाखांची रक्कम शासनाकडे प्रलंबित असून हा निधी तातडीने मिळावा अशी मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर निधी वितरीत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२७-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांच्याकडून प्राप्त मागणीपत्राच्या (दि. १७.०१.२०२५) अनुषंगाने या विभागाच्या दि. २६.०३.२०२५ व दि. ३०.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुक्रमे रु. ३४.०० लक्ष व रु. १०.०० लक्ष असा एकूण ४४.०० लक्ष इतका निधी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्यामार्फत वाशिम जिल्ह्यासाठी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कुपोषित बालकांसाठी नवीन पोषण पुनर्वसन केंद्र सुरु करणेबाबत**

**(४६) ४३४१ (२५-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कुपोषित बालकांसाठी १३ ठिकाणी दिनांक १ जानेवारी,२०२५ रोजी पासून नवीन पोषण पुनर्वसन केंद्र सुरु करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुपोषित बालके व त्यांच्या माता यासाठी स्वतंत्र स्वयंपाकघर (किचन) व खेळण्याची जागा असलेला एक स्वतंत्र वॉर्ड सामान्य रुग्णालयात केला जाणार असून त्याकरीता ६ जणांचे स्वतंत्र मनुष्यबळ असणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विभागातील तांत्रिक मनुष्यबळाचा अभाव लक्षात घेता या वॉर्डासाठी शासनाने स्वतंत्र कर्मचारी नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१४-०५-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात २२ नवीन पोषण पुनर्वसन केंद्र सुरु करण्यात येणार असून त्यापैकी सध्या ४ पोषण पुनर्वसन केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत व उर्वरीत ठिकाणी पोषण पुनर्वसन केंद्र स्थापनेची प्रक्रिया व पदभरती प्रक्रिया ही जिल्हास्तरावर सुरु आहे. तसेच याव्यतिरिक्त २७ बाल उपचार केंद्रांचे पोषण पुनर्वसन केंद्रात रुपांतर करण्यात आले आहे.
(२) अंशत: खरे आहे.

कुपोषित बालकांच्या व्यवस्थापनासाठी स्वयंपाकघर (किचन) व खेळण्याची जागा असलेला वॉर्ड केला जाणार असून सदर केंद्राकरिता ७ जणांचे स्वतंत्र मनुष्यबळ असणार आहे.
(३) पोषण पुनर्वसन केंद्रांसाठी मनुष्यबळ राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर असून पदभरती प्रक्रिया ही जिल्हास्तरावर एनएचएम च्या नियमाप्रमाणे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(४७) ४३४२ (२४-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची देयके त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी ग्रामपंचायत विभागाने माहिती मागितली होती, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदर विभागाने मागितलेल्या काही कागदपत्रांमधील त्रुटी व प्रशासनाने कर्मचाऱ्यांना अपुरी माहिती दिल्याकारणाने हा निधी काही ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात मागील दोन महिन्यांपासून जमा होऊ शकलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीची चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त काही कर्मचाऱ्यांची देयके अदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२४-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत एकूण सहा पंचायत समिती असून सर्व पंचायत समिती स्तरावर निधी वितरित केला आहे. सदर रक्कम संबंधित ग्रामपंचायत कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीच्या संयुक्त बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.
(४) काही ग्रामपंचायत कर्मचारी यांचे संयुक्त खाते उघडण्यास उशीर झाल्याने विलंब झाला

---

**बीड विधानसभा मतदार संघातील रस्त्यांची व पुलांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४८) ४५१४ (२४-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड विधानसभा मतदार संघातील बहुतांश रस्ते व पुलाची दुरवस्था झाली असल्याने सदरील रस्त्याचे व पुलाचे बांधकाम करण्याबाबत संबंधित विभागाला (यथोचित) रितसर पत्र व्यवहार करुन दुरुस्ती करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हास्तरीय बैठकीमध्ये सदरील रस्त्याची लांबी, पुलाच्या बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील कृती आराखड्यामध्ये कामे समाविष्ट असताना देखील अद्यापी सदरहू दुरुस्ती कामासाठी निधी उपलब्ध करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त योजनेअंतर्गत बहुतांश रस्ते व पुलाच्या बांधकामास निधी मंजूर करुन तात्काळ नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१७-०६-२०२५) :** (१), (२), (३) व (४) बीड विधानसभा मतदार संघातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील सुस्थितीतील रस्ते/पूल वगळता निधीच्या उपलब्धतेप्रमाणे काही रस्ते/पूलांची कामे मंजूर असून प्रगतीपथावर आहेत.

सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये बीड विधानसभा मतदार संघातील ग्रामीण भागातील रस्ते/पूलांच्या कामांसाठी खालीलप्रमाणे निधीची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत :-

(रु.लक्ष)

| अ. क्र. | योजना | सन २०२३-२४ | सन २०२४-२५ |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा वार्षिक योजना (३०५४) | ५३०.०० | ६६५.०० |
| २ | रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (३०५४-२४१९) | ७०.२० | ०.०० |
| ३ | मुख्यमंत्री ग्राम सडक योजना | ५८३.८६ | ०.०० |
| ४ | प्रधानमंत्री ग्राम सडक योजना | ९७१.६२ | ६२६.९४ |
| एकूण | | २१५५.६८ | १२९१.९४ |

तसेच यापुढेही जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील रस्ते/पूलांच्या कामांकरिता रस्ते व पूल दुरुस्तीच्या विविध योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड व शिरुर कासार (जि. बीड) या दोन्ही तालुक्यातील अंगणवाड्यांना इमारत बांधकामा निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(४९) ४५४० (२५-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड व शिरुर कासार (जि.बीड) या दोन तालुक्यात एकूण ३७८ अंगणवाड्या पैकी स्वत:च्या मालकीच्या इमारती असलेल्या २११ अंगणवाड्या असून १६७ अंगणवाड्यांना स्वमालकीची इमारत नसल्यामुळे त्या भाड्याच्या जागेत व अन्य ठिकाणी भरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही अंगणवाडीच्या इमारतीचे बांधकाम धोकादायक असल्यामुळे बालकांना याबाबतीत कोणत्याही प्रकारची इजा होवू शकते हे देखील निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंगणवाडीसाठी स्वत:च्या मालकीची इमारत बांधण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी तेथील ग्रामस्थ शासनाकडे वारंवार करीत असून देखील शासन स्तरावरुन त्याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बीड व शिरुर कासार तालुक्यातील १६७ अंगणवाड्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१३-०५-२०२५) :** (१) अंशत:खरे आहे.

बीड व शिरुर कासार या दोन तालुक्यामध्ये एकुण ७७८ अंगणवाडी केंद्र असून त्यापैकी ३६५ अंगणवाडी केंद्र स्वमालकीच्या इमारतीमध्ये, २५४ अंगणवाडी केंद्र भाड्याच्या इमारतीमध्ये व १५९ अंगणवाडी केंद्र अन्य इमारतीमध्ये कार्यान्वित आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ३% राखीव निधी कायमस्वरूपी उपलब्ध करण्यात आला आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्राप्त निधी रुपये ८ कोटी १० लक्ष च्या अनुषंगाने एकूण ७२ अंगणवाडी इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत प्राप्त निधी रुपये ५ कोटी ४० लक्ष रुपये व १३ व्या वित्त आयोगाच्या अखर्चित निधी मधून प्राप्त निधीच्या अनुषंगाने एकूण ८० अंगणवाडी इमारत बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) व (५) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये बीड व शिरुर कासार तालुक्यात जिल्हा वार्षिक योजनेमधुन एकूण १४ अंगणवाडी इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये बीड व शिरुर कासार तालुक्यात एकूण १५ अंगणवाडी इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

---

## महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत संगमेश्वर तालुक्यातील साडवली एम.आय.डी.सी. मधील उद्योग उभारणीबाबत

**(५०) ४६३९ (२४-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील लोहारकाम करणाऱ्या ग्रामीण उद्योजकांनी महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत एम.आय.डी.सी. साडवली (ता.संगमेश्वर) येथे लोहारकाम कारागिरांना सुविधा देण्यासाठी शासन अंतर्गत सामुहिक सुविधा केंद्र उभारण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, या केंद्राच्या उभारणीसाठी सदस्यांनी आपला २० टक्के हिस्सा एक कोटी वीस लाख रुपाये व्याजाने कर्ज काढून आणि दागिने गहाण ठेवून जमा केलेली असून याकरीता आवश्यक असणाऱ्या मशिनरी शासन अनुदानातून स्थापित करण्यात आल्या असून मात्र मशिनरींची ट्रायल अद्याप सप्लायर्स श्री. यासिका INC नवी दिल्ली यांचे कडून झालेली नसल्याने सदर प्रकल्प अद्याप बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, देवरुख साडवली येथील एम.आय.डी.सी. ची लघु औद्योगिक वसाहतीत कार्यरत असणाऱ्या अनेक लघु व मध्यम उद्योगांना अनेक सेवा-सुविधा मिळत नसल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागल्यामुळे येथील अनेक उद्योग अन्यत्र जात आहेत, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, या वसाहतीची जागा १४.५ हेक्टर (सुमारे ३६ एकर) एवढीच असल्यामुळे या ठिकाणी नवीन मोठ्या कारखान्याच्या स्थापनेसाठी अडचणी निर्माण होत आहेत,हे ही खरे आहे काय.
(५)असल्यास, या शहरात मोठ्या MIDC मध्ये रूपांतर झाल्यास मोठे कारखाने येऊन तालुक्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबेल तसेच स्थानिक तरुण उद्योजकांना उद्योग उभारणीसाठी संधी प्राप्त होणार असल्याने यासंदर्भात स्थानिक लघु उद्योजक व लोकप्रतिनिधींकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय.
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२६-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही .

सदर प्रकल्पांतर्गत सामायिक सुविधा केंद्र (CFC) उभारण्यासाठी रुपये ५४६.०४ लक्ष इतक्या प्रकल्प किंमतीस मान्यता देण्यात आली असून त्यापैकी मे.विश्वकर्मा कृषी अवजारे आणि इंजिनिअरींग समुह उद्योग या विशेष हेतू वाहन(SPV) संस्थेचा हिस्सा रुपये १०९.२० लक्ष इतका आहे. सदर योजनेतील तरतुदीनुसार प्राप्त दिनांक ०७/१२/२०२१ रोजीच्या संयुक्त तपासणी अहवालामध्ये नमूद केल्यानुसार प्रकल्पांतर्गत सर्व यंत्रसामुग्री जागेवर सुस्थापित होऊन कार्यान्वित झाल्याचे प्रमाणपत्र सदर SPV च्या अध्यक्षाकडून स्वाक्षरीत करण्यात आले आहे.

तसेच उक्त SPV च्या विनंतीनुसार, दिनांक ०८/१२/२०२४ रोजी मुख्य घन मशीनची दुरुस्ती करण्यात आली असून सदर काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्याबाबत तसेच त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण मिळाल्याबाबतचा संबंधित SPV च्या अध्यक्षांचा साक्षांकित अहवाल प्राप्त झाला आहे.
(३) हे खरे नाही .

साडवली औद्योगिक क्षेत्रातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पक्के रस्ते, पाणी पुरवठा, वीजपुरवठा, पथदिवे इत्यादी सुविधा पुरवण्यात आल्या आहेत.
(४) हे खरे नाही.

साडवली येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्थापन केलेल्या लघु औद्योगिक क्षेत्रासाठी १४.९५ हे.आर. जमीन संपादीत करण्यात आली आहे. सदर क्षेत्र हे लघु औद्योगिक क्षेत्र असल्याने याठिकाणी मोठे उद्योग नाहीत. तसेच कुठल्याही मोठ्या उद्योगाने या औद्योगिक क्षेत्रामध्ये जागा मिळण्यासंदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे लेखी स्वरुपात मागणी केली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.